**रे मु नं १६/२०२५ मधील नि.क्र.५ खालील आदेश**

(प्रविण पाटील व इतर विरूध्द संजय पिंगळे व इतर)

प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतीवादी विरूध्द तुर्तातुर्त व निरंतर मनाई हुकूम मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. मौजे कांढरोली ता. खालापूर येथील ग्रुप ग्राम पंचायत नावंढे यांच्या हद्दीतील गावठाणातील मालमत्ता क्र.२२६ ही दावा मिळकत आहे. या मिळकतीच्या दक्षिण बाजूस तीन फुटाची मोकळी गल्ली असून त्याच्या पलिकडे प्रतिवादी यांची तळ मजल्याची घर क्र.२२७/ब ही मिळकत आहे. या गल्लीचा वापर वादी, प्रतिवादी व गावातील इतर ग्रामस्त तसेच गायी, बैल, म्हैशी इत्यादी पुर्वापार पासून करित आलेल्या आहेत. प्रतिवादींनी दिनांक ३०/०१/२०२५ रोजी वादीच्या व प्रतिवादीच्या घरा दरम्यान असलेल्या मोकळया गल्लीवर लोड बेअरींगचे काम करण्यास सुरवात केली. म्हणून वादीने दिनांक ३१/०१/२०२५ रोजी ग्रामपंचातकडे हरकत अर्ज दिला परंतू ग्रामपंचायतने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. म्हणून दिनांक ०१/०२/२०२५ रोजी वादीचे वडील प्रतिवादीस बांधकामाबाबत विचारणा करिता गेले असता, प्रतिवादींनी वादीस व वादीच्या वडीलांना शिवीगाळी केली. त्यामुळे वादीने दिनांक ०१/०२/२०२५ रोजी खालापूर पोलिस स्टेशन येथे तक्रार दिली. त्यानंतर दिनांक ०३/०२/२०२५ रोजी ग्रामपंचायत नावंढे यांनी प्रतिवादी क्र.१ यांना पत्र देवून वादीच्या हरकत अर्जाचे निवारण होई पर्यंत बांधकाम करू नये असे कळविले. तरीदेखील प्रतिवादीने बांधकाम सुरू ठेवले त्यानंतर दिनांक ०५/०२/२०२५ रोजी वादीने पुन्हा ग्रामपंचायत यांना स्मरण पत्र देवून त्यांनी प्रतिवादीस बांधकाम परवानगी दिली आहे का याची विचारणा केली. त्यानंतर पुन्हा दिनांक ०८/०२/२०२५ रोजी ग्राम पंचायतने प्रतिवादीस बांधकाम थांबविण्यास सांगितले. परंतु प्रतिवादीने बांधकाम सुरूच ठेवले आहे. प्रतिवादी करीत असलेले बांधकाम वादीच्या घराला चिटकून असून त्यामुळे त्यांच्या दरम्यान असलेली गल्ली पूर्ण बंद होणार आहे. त्यामुळे वादीच्या दावा मिळकतीचे नुकसान होईल व वादीच्या मालकी हक्कास बाधा येईल. त्यामुळे वादीचे कधीही भरून न येणारे नुकसान होईल. दिनांक ११/०२/२०२५ रोजी ग्रामपंचायतने वादीस पत्र देवून त्यांनी प्रतिवादीला बांधकामाची कोणतीही परवानगी दिली नसल्याचे कळविले आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे.

२.	वादीचे विधिज्ञ श्रीमती एन. ए. बलकवडे यांचा युक्तीवाद ऐकला.

३.	वादीच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रतीवादी हे दावा मिळकतीस दक्षिण बाजूस असलेली गल्ली पुर्णत: बंद करण्याच्या तयारीत आहेत. वादीने दाव्यासोबत मालमत्ता क्र.२२६ व २२७/ब यांचे उतारे तसेच बांधकामाचे फोटो अभिलेखावर दाखल केलेले आहेत. यावरून प्रतिवादीचे बांधकाम गल्लीच्या वरती सुरू असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत जैस थे चा आदेश केला नाहीतर वादीचे खूप मोठे नुकसान होईल आणि दावा दाखल करुन काही उपयोग होणार नाही. या परिस्थितीत प्रतीवादी यांच्या बांधकामाबाबत काही आदेश केला नाहीतर निश्चितच ते बांधकाम पूर्ण होईल व परत दावा व मनाईचा अर्ज निशाणी क्र.५ निकाली निघण्यास गुंतागुंत होइल. त्यामुळे उपरोक्त सर्व परिस्थिती विचारात घेवून मी खालीलप्रमाणे आदेश पारीतकरीत आहे.

## **<u>आदेश</u>**

१.	प्रतीवादी यांनी वादीच्या दावा मिळकतीच्या दक्षिण बाजूस चिटकून वादी व प्रतिवादी यांच्या घराच्या दरम्यान असलेल्या तीन फुट रूंदीच्या मोकळया गल्लीवर केले असलेले बांधकाम आज ज्यापरिस्थितीत आहे त्याच परिस्थितीत जैसे थे ठेवावे.

२.	वादी यांनी दिवाणी प्रक्रिया सहिता आदेश ३९ नियम ३ ची पुर्तता करावी.

३.	प्रतीवादी हे हजर होवून मनाईच्या अर्जास म्हणणे दाखल करत नाही, तोपर्यंत जैसे थे चा आदेश कायम करण्यात यावा.

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2025.02.15 17:54:56 +0530

**( डी. एस. खोत )**

दिनांक : ०५/०२/२०२५.

२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
खालापूर